# जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय

**(जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण)**

---

वाचा: १. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि. १४.०३.२०२०

२. अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक १४.०३.२०२०

३. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७

४. महाराष्ट्र शासन क्र.करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि.१४.०३.२०२०

५. या कार्यालयाचे आदेश (उपचीटनिस) क्र.२०२०/एमएजी/कक्ष-१/कावि-५५२ दिनाक:-२५.०३.२०२०

६. या कार्यालयाचे आदेश क्र.२०२०/आ.व्य./कावि-११६ दिनाक:-२१.०३.२०२०

---

क्र.२०२०/आ.व्य./कावि-३३३ दिनाक:-११.०४.२०२०

परिपत्रक:-

**विषय:** राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.
**(गरजू व्यक्तींना अन्न धान्य, जेवणाचे वाटप करताना फोटो / व्हिडीओ/चित्रीकरण करण्यास मनाई.)**

ज्याअर्थी संदर्भीय शासन पत्रकान्वये शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दिनांक १३.०३.२०२० पासून लागू करून खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. याबाबतची नियमावलीही तयार करण्यात आली असून स्वतंत्ररीत्या निर्गमित करण्यात आली आहे. त्याअन्वये जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यानुसार संदर्भ क्र. ६ अन्वये लातूर जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.

देशभरात लॉकडाऊन झाल्यापासून अनेक दानशूर व्यक्ती पुढे येऊन गरजूंना मदत करीत आहेत. मात्र ही मदत करताना अनेकांनी त्याचे फोटो/व्हिडीओ/चित्रीकरण करून सोशल मीडियावर टाकले आहेत यामुळे गोरगरीब / गरजू व्यक्तींची अवहेलना होत असल्याचे निदर्शनास येत असून यामुळे अशा व्यक्तींच्या स्वाभिमानास ठेच पोचण्याची शक्यता नाकारता येत नाही. माझे असेही निदर्शनास आले आहे की, अन्नधान्य, जेवणाचे वाटप करताना गर्दी होते त्यामुळे सामाजिक अंतर पाळले जात नसल्याने लॉकडाऊनचा मुख्य हेतू साध्य होत नाही.

सबब ही बाब लक्षात घेऊन या परिपत्रकाद्वारे सर्व जिल्हावासियांना सूचित करण्यात येते कि, कुणीही गरजू व्यक्तींना अन्नधान्य, जेवण व तत्सम मदत साहित्य देताना फोटो/ व्हिडिओ/चित्रीकरण करून सामाजिक माध्यमावर पाठवू नये. तसेच अशा गोरगरीब / गरजू व्यक्तींच्या स्वाभिमानास ठेच पोचणार नाही याची विशेष दक्षता घ्यावी.

अशा प्रकारे गरजू व्यक्तींना अन्नधान्य, जेवण व तत्सम मदत साहित्य देताना फोटो/ व्हिडिओ बनवून सामाजिक माध्यमावर टाकल्याचे निदर्शनास आल्यास साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये दिलेल्या तरतुदीनुसार भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे समजण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

(जी. श्रीकांत) भा.प्र.से.
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण लातूर**

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, लातूर यांना प्रसिद्धीस्तव.

---

Phone: (02382-220204, 224001) Fax: (02382-222330)
Website: www.latur.nic.in, E-mail: laturcollector@gmail.com, rdclatur@gmail.com , ddmolatur@gmail.com

Scanned with CamScanner